# चिकित्सालयीन औषधशास्त्र विभाग
# पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, उदगीर

## कोविड-१९ महामारीमध्ये पशुवैद्यकांसाठी सल्ला

- दवाखान्यात कर्तव्यावर जाताना मास्क, हातमोजे, गॉगल, टोपी व अप्रोन/ गाउन परिधान करूनच हजर राहावे.
- पशुवैद्यकीय दवाखान्यात दर्शनी भागात साबण, पाणी, हॅंड सॅनीटायझर उपलब्ध करण्यात यावा.
- दवाखान्यात दैनंदिन कामकाज सुरु करण्यापूर्वी आपले हात साबण किंवा हॅंड वाश ने किमान २० सेकंद घासून धुवून स्वच्छ करावेत व नंतर हातमोजे घालावेत.
- एका वेळी एक पेशंट सोबत शक्यतो एकच पशुपालक राहील याची दक्षता घ्यवी.
- पशुपालक व सोबत आलेले नातेवाईक यांनी तोंडाला मास्क वापरणे बंधनकारक करावे.
- पशुपालाकासही तपासणीपूर्वी व नंतर साबण किंवा हॅंड वाश ने हात स्वच्छ करणे बंधनकारक करावे.
- सर्दी-पडसे किंवा खोकला असलेल्या पशुपालक किंवा त्याच्या नातेवाईकास दवाखान्यात प्रवेश टाळावा.
- एक वेळ जनावर तपासणी केल्यानंतर शक्य तेथे पुढील उपचार व पाठपुराव्यासाठी टेलीमेडिसिनचा वापर करावा.
- हातमोजे घातल्यानंतर हाताचा स्पर्श कान, डोळे, नाक व चेहऱ्यावरील इतर ठिकाणी होणार नाही याची दक्षता घ्यावी.
- किमान ६०% अल्कोहोलमिश्रित ७ मिली सनीटायझर दोन्ही हातावर घेवून, हात दोन्ही बाजूने निर्जंतुक करून घ्यावेत.
- कार्यालय/ दवाखान्यातील कामकाजाचे ठिकाण व तेथील नेहमी हाताचा संपर्क येणाऱ्या वस्तू (विजेची बटन, दरवाज्याचा हॅंडल, पाण्याचे नळ) दर तीन तासाला १% सोडियम हायपोक्लोराईड द्रावणाने फवारून निर्जंतुक करावेत.
- दैनंदिन काम करत असताना दोन व्यक्तीमधील अंतर किमान १ मीटर राहील याची अट्टाहासाने काळजी घ्या.
- कामकाजादरम्यान भ्रमणध्वनीचा वापर अनिवार्य असल्यास शक्यतो स्पीकरवर बोलणे करावे जेणेकरून फोनचा चेहऱ्याशी संपर्क होणार नाही.
- कर्तव्यावरून घरी गेल्यावर सर्वात प्रथम साबण व स्वच्छ पाण्याने अंघोळ करून घ्यावी व कपडे तात्काळ धुवून निर्जंतुक करून घ्यावेत.
- अपरिहार्य परिस्थितीत जास्त लोकांना एका ठिकाणी काम करावयाची आवश्यकता पडल्यास छोटे छोटे समूह करून त्यांमध्ये १ मीटर अंतर ठेवून योग्य उपाययोजना वापरून कामकाज करावे.

डॉ. अनिल भिकाने व डॉ. रविंद्र जाधव
चिकित्सालयीन औषधशास्त्र विभाग, पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, उदगीर